**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक**

**ग्रंथालय आणि माहितीस्त्रोत केंद्र**



कुसुमाग्रज अध्यासनाच्या

# विशाखा काव्य पुरस्कारासाठी कवितासंग्रह पाठवायचे आवाहन

विद्यापीठाच्या कुसुमाग्रज अध्यासनाच्या वतीने नवोदित कवीच्या पहिल्या प्रकाशित काव्य संग्रहासाठो '**विशाखा काव्य पुरस्कार**' देण्यात येतात. सन 2022 आणि 2023 मध्ये प्रकाशित झालेला नवोदित कवींचा पहिला काव्यसंग्रह यासाठी विचारात घेतले जातील. यास्तव दि. 1 जानेवारी 2022 ते 31 डिसेंबर 2022 ते 1 जानेवारी 2023 ते 31 डिसेंबर 2023 या कालावधीत प्रसिद्ध झालेला काव्यसंग्रह पाठवावा.सन 2022 आणि सन 2023 या दोन वर्षांसाठी प्रथम, द्वितीय आणि तृतीय असे प्रत्येकी तीन पुरस्कार देण्यात येतील. पुरस्कारासाठी काव्यसंग्रह दि. 25 डिसेंबर 2024 किंवा त्यापूर्वी विद्यापीठाला प्राप्त व्हायला हवेत.

पुरस्काराची नियमावली :

1) पुरस्कारासाठी कोणतेही प्रवेश शुल्क नाही.

2) कवितासंग्रह मराठी भाषेतच असावा.

3) पुरस्कारासाठी कवीचा फक्त प्रथम प्रकाशित कवितासंग्रहच ग्राह्य धरण्यात येईल.

4) कविता संग्रहाची या आधी इ- आवृत्ती प्रकाशित झालेली नसावी.

5) सन 2022 आणि सन 2023 या दोन वर्षासाठी स्वतंत्रपणे पुरस्कारासाठी निवड करण्यात येईल.

6) कवितासंग्रहावर प्रकाशन वर्ष ठळकपणे छापलेले असावे.

7) कवितासंग्रहाच्या 5 प्रती पाठवणे आवश्यक.

8) स्पर्धकाने पाठवलेल्या काव्यसंग्रहांच्या प्रती परत पाठवल्या जाणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी.

9 ) कवीचा पहिला काव्यसंग्रह असल्याचे प्रतिज्ञापत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

10) पहिला कवितासंग्रह असल्याचे प्रतिज्ञापत्र जोडले नसल्यास, काव्यसंग्रह विचारात घेतला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

11 ) पुरस्कारासाठी कवी स्वतः किवा प्रकाशक किंवा कवीचे हितचिंतक काव्यसंग्रह पाठवू शकतात. मात्र काव्यसंग्रहाच्या 5 प्रती पाठवणे आवश्यक.

12 ) काव्यसंग्रहासोबत कवीचे पासपोर्ट आकाराचे 2 फोटो आणि परिचयपत्र पाठवणे आवश्यक आहे. परिचयपत्रात कवीचा संपूर्ण पत्ता, इमेल आणि भ्रमणध्वनी क्रमांक नमूद केलेला असावा.

13) कवितासंग्रह पोस्टाने पाठवावेत, खाजगी कुरीयरने पाठवू नयेत. पाकीटावर 'विशाखा काव्य पुरस्कारासाठी' असा उल्लेख करावा.

14) निवड समितीचा निर्णय अंतिम असेल,

15) कवितासंग्रह पाठविण्याचा पत्ता:-

प्रमुख , कुसुमाग्रज अध्यासन, ज्ञान स्त्रोत केंद्र<br>
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,<br>
गोवर्धन, नाशिक-422222

(डॉ.दिलीप धोंडगे)<br>
प्रमुख,कुसुमाग्रज अध्यासन